क्र.२/नसचि/महासभा/ ०९ /२०१७-२०१८
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ०८ मार्च २०१८

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## महानगरपालिका सभा क्रमांक - ०९ /२०१७-२०१८

## महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ------------------------------------------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **सोमवार दिनांक १९/०३/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

८/३/१८
**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

## परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.२०/०२/२०१८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
   अ) दु:खवठ्याचे ठराव.
   ब) अभिनंदनाचे ठराव.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिका क्षेत्रातील सांगली येथील जुने स्टेशन चौकास (बी.एस.एन.एल.चौक) हिंदू-हृदयसम्राट मा.बाळासाहेब ठाकरे असे नामकरण करणेकामी स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन हरकती व सूचना मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०१/०२/२०१८ चे विषयपत्र.**

५. महापालिका क्षेत्रातील कुपवाड येथील मुख्य रत्यामधील नागराज चौक ते महापालिकेच्या जुन्या प्रभाग क्र.३ कार्यालयाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यास स्वातंत्र्य सैनिक कै.धोंडीराम बापू माळी असे नामकरण करणेस अंतीम मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०३/०२/२०१८ चे विषयपत्र.**

६. महापालिकेकडून विविध विकास कामांसाठी बिलातून कपात होणाऱ्या अनामत रक्कम अधिनियमातील तरतुदीनुसार तीन वर्षाच्या आत मागणी न केलेल्या सन २००३-२००४ ते सन २०११-१२ पर्यंतच्या अनामत रक्कमा मा.महासभेंच्या मान्यतेने व्यपगत करणेत येवून, सदरची रक्कम स्वतंत्र खाते उघडून वर्ग करणेत आलेली आहे. सदर व्यपगत केलेली अनामत रक्कम मक्तेदारांना मागणी अर्जानुसार परत करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.२०/०९/२०१७ चे पत्र.**

... २ ...

७. महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथील १०३१९/४ क्षेत्र ७६३.८० चौ.मी. हा ओपन स्पेस स्व-खर्चाने विकासीत करणेस सौ.वनश्री विलास कुलकर्णी यांनी विनामुल्य मागणी केली आहे. त्यांचे मागणीनुसार सदरची जागा सर्व नागरीकांना खुले राहील व व त्याची मालकी महापालिकेचीच राहील या अटीवर ९ वर्षे मुदतीने वापरास देणेस धोरणात्मक निर्णय घेणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०३/०२/२०१८ चे विषयपत्र.**

८. महापालिका क्षेत्रातील सांगली स.नं.५५८/१ब या जमिनी मधील भोबे गटार जोडणे कामी श्री.जावेद रमजान शेख यांची जागा ताब्यात घेवून महापालिका मालकीची पर्यायी जागा उपलब्ध करुन देणेस निर्णयार्थ आलेले **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.०७/०३/२०१८ चे विषयपत्र.**

९. महापालिका क्षेत्रातील संरक्षण दलातील शौर्य पदक धारक आणि माजी सैनिकांच्या विधवांना मालमत्ता करातून सुट देणेस तसेच, संरक्षण दलातील अविवाहित शहीद झालेल्या सैनिकांच्या नामनिर्देशित मालमत्तांना मालमत्ता करातून सुट देणेस निर्णयार्थ आलेले **उपायुक्त (मालमत्ता कर विभाग) यांचे दि.२७/०२/२०१८ चे विषयपत्र.**

१०. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

११. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

8.3.18

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०९** दिनांक :- १९/०३/२०१८
२२/०३/२०१८
२६/०३/२०१८

ठराव क्रमांक :- ९८६

विषय क्रमांक :- ०४

---

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०१/०२/२०१८ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली येथील जुने स्टेशन चौकास (बी.एस.एन.एल.चौक) हिंदू-हृदयसम्राट मा.बाळासाहेब ठाकरे असे नामकरण करणेकामी स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन हरकती व सूचना मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (मा. [illegible])

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

अनुमोदक (मा. [illegible])

[illegible]

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०९** दिनांक :- १९/०३/२०१८
२२/०३/२०१८
२६/०३/२०१८

ठराव क्रमांक :- १८७

विषय क्रमांक :- ०५

---

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०३/०२/२०१८ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका क्षेत्रातील कुपवाड येथील मुख्य रत्यामधील नागराज चौक ते महापालिकेच्या जुन्या प्रभाग क्र.३ कार्यालयाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यास स्वातंत्र्य सैनिक कै.धोंडीराम बापू माळी असे नामकरण करणेस स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिर प्रसिद्धी करणेत येवून, सुचना व हरकती मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत कोणत्याही प्रकारच्या हरकती व सूचना प्राप्त झाल्या नसल्याने, महापालिका क्षेत्रातील कुपवाड येथील मुख्य रत्यामधील नागराज चौक ते महापालिकेच्या जुन्या प्रभाग क्र.३ कार्यालयाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यास स्वातंत्र्य सैनिक कै.धोंडीराम बापू माळी असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतीम मान्यता देत आहे.

सूचक :- 

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- 

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०९**

दिनांक :- १९/०३/२०१८
२२/०३/२०१८
२६/०३/२०१८

ठराव क्रमांक :- १८८

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.२०/०९/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिकेकडून विविध विकास कामांसाठी बिलातून कपात होणाऱ्या अनामत रक्कम अधिनियमातील तरतुदीनुसार तीन वर्षाच्या आत मागणी न केलेल्या सन २००३-२००४ ते सन २०११-१२ पर्यंतच्या अनामत रक्कमा मा.महासभा ठराव क्र.१५० दि.२०/०१/२०१६ मान्यतेने व्यपगत करणेत येवून, सदरची रक्कम स्वतंत्र खाते उघडून वर्ग करणेत आलेली आहे. सदर व्यपगत केलेली अनामत रक्कम संबंधीत मक्तेदारांचे मागणी अर्जानुसार परत करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

कार्यकारी अभियंता (पा.पु.)

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०९** | दिनांक :- १९/०३/२०१८ 
२२/०३/२०१८ 
२६/०३/२०१८

ठराव क्रमांक :- १६९

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०१/०२/२०१८ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या मिरज येथील सि.स.नं.१०३१९/४ क्षेत्र ७६३.८०चौ.मि.इतकी खुली जागा सौ.वनश्री विलास कुलकर्णी यांनी सदरचा खुला भूखंड स्वखर्चाने विकसीत करणेस मिळावा अशी लेखी अर्जाद्वारे विनंती केली आहे.

महापालिकेच्या वापरात नसलेल्या खुल्या जागेवर महापालिकेकडून पुरेशी यंत्रणा नसलेने स्वच्छता व देखभाल पूर्ण क्षमतेने व्यवस्थितीत होत नाही. सौ.वनश्री कुलकर्णी यांचा सदरची जागा विकसीत करणेचा सामाजिक हेतू विचारात घेता, त्यांना सदर जागा विकसीत करणेस दिल्यास त्यावर बाग-बगीचा, लहान मुलांसाठी खेळणी व वृद्धांसाठी फिरण्यास व बसण्यास सोय होणार असून, सदरची जागा सौ.कुलकर्णी स्वखर्चाने विकासीत करणार असून, त्या भागातील नागरीकांनी सदर जागा स्वच्छ ठेवणे, झाडे लावणे,बाग देखभाल करणेसाठी परवानगी मागितली आहे. यासाठी सदरची जागा स्वच्छ करुन, वृक्षारोपन करणेस व जागेची मालकी महापालिकेची राहील या अटीवर देणे उचित होईल असे या सभेचे मत असून, मिरज येथील सि.स.नं.१०३१९/४ क्षेत्र ७६३.८०चौ.मि. या खुल्या जागेवर महापालिकेची मालकी राहील या अटीवर सौ.वनश्री विलास कुलकर्णी यांनी भूखंड स्वखर्चाने विकसीत करणेस व देखभाल दुरुस्ती करणेस महापालिकेच्या शर्ती-अटीनुसार ९ वर्षे मुदतीने विना मोबदला देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (मा. किशोर जामदार)

अनुमोदक :- (मा. शेवंता वाघमारे)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

माहितीसाठी व्यवस्थापक

नगरसचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०९ | दिनांक :- १९/०३/२०१८
२२/०३/२०१८
२६/०३/२०१८

ठराव क्रमांक :- १९०

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.०७/०३/२०१८ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका क्षेत्रातील सांगली स.नं.५५८/१ब या जमिनी मधील भोबे गटार जोडणे कामी श्री.जावेद रमजान शेख यांची जागा ताब्यात घेवून महापालिका मालकीची पर्यायी जागा उपलब्ध करुन देणेस निर्णयार्थ आलेल्या विषयास अनुसरुन सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्राची प्रारुप विकास योजना भागश: मंजूर झालेली आहे. त्यानुसार सांगली स.नं.५५८/१ब मधील काहीअंशी भाग राष्ट्रीय मार्ग क्र.४२ ने अंशत: बाधीत होतो. जमीन मालक श्री.जावेश रमजान शेख हे रस्ता चौपरीकरणाने बाधीत होणारे क्षेत्र वगळून उर्वरित महापालिका क्षेत्रातील क्षेत्र भोबे गटार जोडणेस व रस्त्याकरीता देणेस तयार आहेत. वाहतूकीच्या दृष्टीने रस्ता संलग्न होणे व सांडपाण्याच्या निचऱ्याची सोय होणे यादृष्टीने वळण रस्ता खुला होणे आवश्यक आहे. याबाबीकरीता श्री.शेख यांचे मालकीचे स.नं.५५८/१ब मधील ८३.६५ चौ.मी. (९०० चौ.फुट) ताब्यात घेवून, त्याच्या मोबदल्यात सांगली स.नं. ५४५/१अ या मनपाच्या मालकी जागेतील ९०० चौ.फुट जागा श्री.शेख यांना विना मोबदला देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- [signature]

अनुमोदक :- [signature]

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
महापौर,

सहा. संचालक (नगररचना)

[signature]
महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०९**

दिनांक :- १९/०३/२०१८
२२/०३/२०१८
२६/०३/२०१८

ठराव क्रमांक :- १९१

विषय क्रमांक :- ०९

सोबतची उपायुक्त (कर निर्धारक व संकलक विभाग) यांचे दि.२७/०२/२०१८ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका कार्यक्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या संरक्षण दलातील शौर्यपदक धारक आणि माजी सैनिकांच्या विधवांना मालमत्ता करातून सूट देणेस शासन निर्णय दि.०५ एप्रिल २०१६ तसेच, संरक्षण दलातील अविवाहित शहिद झालेल्या सैनिकांच्या नामनिर्देशित मालमत्तांना मालमत्ता करातून सूट देणेस शासन निर्णय दि.०९ जानेवारी २०१७ रोजी निर्णय झालेले आहेत. त्यानुसार पूणे व कोल्हापूर महानगरपालिकेने सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी केलेचे समजलेवूरुन सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नागरी स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रात राहणाऱ्या देशासाठी प्राणाची बाजी लावून जिवाची पर्वा न करता नि:स्वार्थपणे देशाचे संरक्षण करताना बजाविणेत आलेल्या उत्कृष्ठ कामगिरी करीता संरक्षण दलातील शौर्यपदक धारकांना आणि माजी सैनिकांच्या विधवांना तसेच, संरक्षण दलातील अविवाहित शहिद झालेल्या सैनिकांच्या नामनिर्देशित मालमत्तांना मालमत्ता करातून सूट देणेस पात्र ठरणाऱ्या व्यक्तीने जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणेच्या अटीवर विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

कर निर्धारक व संकलक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.